निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २६८ वा.
मंगळवार :०२ डिसेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंडे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247


# मतदानाला अवघे काही तास, हिंगोलीत कारमध्ये सापडलं घबाड

**पोलिसां कडून मोठी रक्कम जप्त, तपास सुरू**

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली /प्रतिनिधी/** राज्यात निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून उद्या २ डिसेंबर रोजी राज्यातील जवळपास अडीचशेपेक्षा जास्त नगरपालिका आणि नगरपंचायतींसाठी मतदान होत आहे. त्यासाठी, प्रचाराची वेळ अवघ्या काही तासांत संपणार असून नेते, कार्यकर्ते उत्साहा आहेत. एकीकडे मतदान प्रक्रियेसाठी प्रशासन सज्ज झाले असून दुसरीकडे कार्यकर्ते मतदारांपर्यंत पोहोचत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर पोलीस यंत्रणाही सतर्क झाली असून पैसे वाटप, आमिष दाखवून होणाऱ्या इतर वस्तूंच्या वाटपाकडे लक्ष ठेऊन आहे. त्यातच, हिंगोली शहरात एका बॅगमध्ये मोठी रोकड सापडल्याने खळबळ उडाली आहे. १००,२००,५०० अन् ५० रुपयांच्या नोटांचे बंडल पांढऱ्या रंगाच्या बॅगमध्ये आढळून आले आहेत. याप्रकरणी, अधिक तपास सुरू आहे.

हिंगोली शहरांतील शेतकरी भवन परिसरामध्ये हिंगोली पोलिसांच्या पथकाने टाटा नेक्सन कंपनीच्या चार चाकी गाडीमधून एक कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. पोलीस आणि निवडणूक विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या चार चाकी गाडीची तपासणी केली असता, त्यात बॅगमध्ये मोठी रक्कम आढळून आली. या बॅगमधील संपूर्ण रोकड घेऊन निवडणूक निर्णय अधिकारी त्यांच्या कार्यालयात दाखल झाले आहेत.

दरम्यान, पोलिसांनी जप्त केलेली ही रोकड एका खासगी व्यापाऱ्याची असल्याची माहिती मिळत असून कॅश बाळगण्याबाबत आमच्याकडे परवानगी असल्याचं संबंधित व्यक्तीने म्हटलं आहे. मात्र, निवडणूक विभागाच्या वतीने संबंधित रोकड पडताळणी आणि प्राथमिक चौकशीच्या अनुषंगाने ताब्यात घेण्यात आली असून रोकड मोजली जात आहे. तसेच, कारमधील व्यक्तींकडून संबंधित कागदपत्रांचीही तपासणी केली जात आहे. या संपूर्ण रोकडची तपासणी व प्राथमिक चौकशी निवडणूक विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी करत आहेत. मात्र, निवडणूक काळात मतदानाच्या आदल्या दिवशी एवढ्या मोठ्या प्रमाणात रोकड सापडल्याने खळबळ उडाली आहे.

ऐनवेळी निवडणुका स्थगित झाल्याने संताप



एकीकडे निवडणुकांसाठी मतदानाची तयारी सुरू असतानाच निवडणूक आयोगाने काही जिल्ह्यातील नगरपालिकांच्या निवडणुका स्थगित केल्या आहेत. मात्र, ऐनवेळी निवडणुका स्थगित केल्याने उमेदवारांची आणि कार्यकर्त्यांची चांगलीच धांदल उडाली असून सुधारित कार्यक्रमही जाहीर करण्यात आला आहे. मात्र, आता नव्याने प्रचार यंत्रणा कशी राबवायची असा प्रश्न उमेदवार व राजकीय पक्षांपुढे आहे. त्यामुळे, सत्ताधारी आणि विरोधक दोघांनीही आयोगाच्या या निर्णयावर नाराजी दर्शवली आहे. तर, विरोधकांनी या निर्णयावरुन सरकारलाच लक्ष्य केलंय.

# फुलंब्री नगरपंचायतीची निवडणूक लांबणीवर - जबाबदार कोण?

**भाजप उमेदवार सुहास शिरसाठ यांचा राजेंद्र ठोंबरे यांच्यावर आरोप; ठोंबरे यांचेही प्रतिउत्तर**

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री /प्रतिनिधी/** फुलंब्री नगरपंचायतीच्या निवडणुकीवरून सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांना शनिवारी अधिक वेग आला. भाजपा महायुतीकडून नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सुहास शिरसाठ यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार राजेंद्र ठोंबरे यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले. तर ठोंबरे यांनीही हे आरोप फेटाळून भाजपावर पलटवार केला.

### निवडणूक पुढे ढकलल्याचा आरोप - सुहास शिरसाठ



पत्रकार परिषदेत बोलताना सुहास शिरसाठ म्हणाले की,फुलंब्री नगरपंचायतीची निवडणूक नियोजित तारखेला न होण्यास राजेंद्र ठोंबरे सरळ जबाबदार आहेत. त्यांनी केलेल्या न्यायालयीन अपीलमुळे संपूर्ण प्रक्रिया स्थगित झाली आणि निवडणूक आयोगाने कार्यक्रम पुढे ढकलला.

शिरसाठ यांनी मांडलेली प्रमुख मांडणी:राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशांनुसार ज्याठिकाणी अर्जावरील अपील प्रलंबित होते, त्या जागांची निवडणूक थांबविण्याचे आदेश होते.निकेत राजेंद्र ठोंबरे यांनी केलेले अपील २२ नोव्हेंबरनंतर दाखल झाल्याने फुलंब्री नगरपंचायतीची निवडणूक थांबवावी लागली. निकेत ठोंबरे हे राजेंद्र गंगाधर ठोंबरे यांचे पर्यायी उमेदवार असल्याने, मुख्य उमेदवाराचा अर्ज पात्र ठरल्यानंतर नियमाप्रमाणे त्यांचा पर्यायी फॉर्म अपात्र ठरला. नियम स्पष्ट असूनही न्यायालयात अपील दाखल करून निवडणूक प्रक्रियेचा मार्ग अडवण्यात आला, असा आरोप शिरसाठ यांनी केला.

त्यांनी ठोंबरे यांच्यावर स्वार्थासाठी फुलंब्रीवासियांना वेठीस धरण्याचा आरोपही केला.शिरसाठ यांचे म्हणणे असे की, फुलंब्री नगरपंचायतीची निवडणूक पुढे ढकलण्यास राजेंद्र ठोंबरे यांची थेट जबाबदारी आहे. स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी ते वारंवार गावाचा विकास अडवतात.

### राजेंद्र ठोंबरे यांचा भाजपावर पलटवार



या आरोपांवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) महाविकास आघाडीकडून नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजेंद्र ठोंबरे यांनी प्रतिक्रिया दिली.त्यांनी स्पष्टपणे सांगितले की- मी इतका मोठा अधिकारी नाही की माझ्यामुळे निवडणूक आयोग निवडणूक रद्द करेल. हे आरोप म्हणजे भाजपा महायुतीची निव्वळ भीती दाखवणारी युक्ती आहे.ठोंबरे यांनी पुढे आरोपांचे खंडन करत म्हटले:त्यांच्या विरोधात भाजपाच न्यायालयात गेले होते, आणि त्याच प्रकरणात न्यायालयाने त्यांना दिलासा दिला.

–न्यायालयाचा निकाल माझ्या बाजूने आला, म्हणजेच मीच पात्र. तरीही माझ्यावर आरोप करणे हास्यास्पद आहे, असे त्यांनी सांगितले. फुलंब्रीत भाजपाचा निश्चित पराभव होत असल्याने निवडणूक पुढे ढकलली जावी असे त्यांनाच लाभदायक वाटत होते, असा दावा त्यांनी केला. जनतेला सर्व माहिती आहे. खोटे आरोप करून भाजपा मतदारांना दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहे, असे ठोंबरे यांनी नमूद केले.

### निवडणूक स्थगितीचे कायदेशीर कारण

दस्तऐवजांनुसार:

–अर्जासंबंधी दाखल झालेले अपील २३ नोव्हेंबरनंतर सादर झाले, त्यामुळे नियमांनुसार त्या जागेची निवडणूक स्थगित ठेवावी लागते.

–२५ नोव्हेंबर २०२५ रोजी न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार हा निर्णय कायम राहिला.

–त्यामुळे फुलंब्री नगरपंचायतीची २ डिसेंबरला होणारी निवडणूक पुढे ढकलून २० डिसेंबर २०२५ रोजी जाहीर करण्यात आली आहे.

–फुलंब्रीतील राजकीय वातावरण तापले

–या प्रकरणामुळे फुलंब्रीत राजकीय तापमान आणखी वाढले आहे.

एका बाजूला भाजपा उमेदवार ठोंबरे यांना जबाबदार धरत आहेत, तर दुसरीकडे ठोंबरे भाजपावर खोटे आरोप आणि भीतीची राजकारण केल्याचा आरोप करत आहेत.येणाऱ्या काही दिवसांत प्रचाराचा जोर वाढणार असून, ही निवडणूक स्थानिक राजकारणात मोठे वळण आणण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.

# बीडमध्ये मोठी घडामोड

**हेमंत क्षीरसागर यांचा संदीप क्षीरसागर यांच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराला पाठिंबा**

**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/प्रतिनिधी/**बीडमध्ये नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी राजकीय वर्तुळात मोठा फेरफार झाला आहे. आमदार संदीप क्षीरसागर यांच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवारास पाठिंबा देण्यासाठी त्यांचे भाऊ हेमंत क्षीरसागर यांनी शेवटच्या दिवशी मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात नवे राजकीय समीकरण तयार झाले आहे.

हेमंत क्षीरसागर यांनी एबीपी माझाशी बोलताना सांगितले की, आज प्रचाराचा शेवटचा दिवस आहे. बीडमध्ये या वर्षी सर्वसमावेशक चेहरा म्हणून स्मिता वाघमारे समोर येत आहेत. स्मिता वाघमारे आणि आमचे कौटुंबिक संबंध अनेक वर्षांपासून आहेत. विष्णू वाघमारे हे बीड शहरात गेल्या २५ वर्षांपासून काम करत आहेत आणि सामान्य जनतेच्या मुलभूत गरजांसाठी ते सतत कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांना मदत करण्याचा निर्णय घेतला आहे.

हेमंत क्षीरसागर यांनी स्पष्ट केले की, आमचे काका जयदत्त क्षीरसागर मोठे आणि अनुभवी नेते आहेत. त्यांच्या निर्णयाचा आम्ही सन्मान करतो, पण आमचा निर्णय स्वतंत्र आहे. आज आम्ही स्मिता वाघमारे यांना पाठिंबा देत आहोत. निवडणुकीत अनेक पक्ष आणि उमेदवार रिंगणात आहेत, अशावेळी लोक काम करणारा चेहरा पाहून मतदान करतील.

राजकीय पार्श्वभूमी पाहता, बीडमध्ये निवडणूक रंगतदार बनली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) आणि शिवसेना (उबाठा गट) यांनी संयुक्तपणे स्मिता विष्णू वाघमारे यांना नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी दिली आहे. भाजपने डॉ. ज्योतीताई घोमरे (घुंबरे) यांना उमेदवारी दिली आहे, तर अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रेमलता दादासाहेब पारवे या उमेदवार ठरल्या आहेत.

मागील बीड नगरपालिका निवडणुकीत हेमंत क्षीरसागर यांनी महत्त्वाची भूमिका बजावून उपनगराध्यक्ष पद मिळवले होते. मात्र काका जयदत्त क्षीरसागर यांच्या भूमिका आणि समर्थनानंतर शेवटच्या दिवशी हेमंत क्षीरसागर यांनी आमदार संदीप क्षीरसागरांच्या नगराध्यक्ष उमेदवाराला पाठिंबा देऊन नवे राजकीय समीकरण निर्माण केले आहे. त्यामुळे बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत मतदारांना अधिक पर्याय मिळाले असून निवडणूक थरारक आणि आकर्षक बनली आहे.

या निर्णयामुळे फक्त कौटुंबिक संबंध नव्हे तर शहरातील कार्यक्षम आणि अनुभवसंपन्न व्यक्तींना संधी देण्याचा संदेशही देण्यात आला आहे. हे राजकीय समीकरण भविष्यातील स्थानिक राजकारणावर मोठा परिणाम टाकू शकते, कारण यामुळे पक्षांच्या आतल्या गटांमध्ये आणि जनतेमध्ये धोरणात्मक बदल दिसून येऊ शकतात.

## संक्षिप्त

### समृद्धी महामार्गावर सावंगी इंटरचेंजजवळ ट्रकमधील मालाला अचानक आग



**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री/प्रतिनिधी/** फुलंब्री पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या औरंगाबाद-जळगाव महामार्गावरील समृद्धी महामार्गावर सावंगी इंटरचेंज येथे दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ११.४५ वाजेच्या सुमारास ॲल्युमिनियम वेस्टेज मालाने भरलेल्या ट्रकला अचानक आग लागल्याची घटना घडली.

सीजी ०८ एएक्स ४७०१ हा ट्रक तळोदा, नवी मुंबई येथील कंपनीचा माल घेऊन मुंबईकडून नागपूरकडे जात असताना ही दुर्घटना झाली. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाने तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन आग विझविण्यात यश मिळवले.

सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. ट्रक चालकाचे नाव मोहम्मद नदीम असून ट्रक बाजूला घेण्यात आला आहे. दरम्यान वाहतूक काही वेळ विस्कळीत झाली असली तरी आता पूर्णपणे सुरळीत झाली आहे.या प्रकरणाची नोंद फुलंब्री पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

### राज्य लॉटरीच्या ऑक्टोबर महिन्यातील मासिक,साप्ताहीक सोडतीचा निकाल

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** महाराष्ट्र राज्य लॉटरीतर्फे प्रत्येक महिन्यात ५ मासिक व ६ भव्यतम सोडती तसेच साप्ताहिक सोडती काढल्या जातात. ऑक्टोबर २०२५ मध्ये महाराष्ट्र दसरा भव्यतम, महाराष्ट्र सह्याद्री, महाराष्ट्र गौरव, महाराष्ट्र गणेशलक्ष्मी दसरा विशेष, महाराष्ट्र तेजस्विनी व महाराष्ट्र गजराज या मासिक सोडती काढण्यात आल्याचे उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी, वाशी यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे कळविले आहे.३ ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्र दसरा भव्यतम सोडतीमधून तिकीट क्रमांक उ्ह-०२ २५५९७ रूपये ५०,००,०००/- चे बक्षिस अग्रवाल लॉटरी एजन्सी, धुळे यांचेकडून विक्री झालेल्या तिकीटास प्रथम क्रमांकाचे बक्षिस व १,००,०००/- ची २ बक्षिसे जाहीर झाली आहेत.८ ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्र सह्याद्री या मासिक सोडतीमधून चड२५१०---४६६०१ या चिराग एंटरप्रायजेस, नाशिक यांचेकडून विक्री झालेल्या तिकिटास रक्कम रु.२१ लाखाचे प्रथम क्रमांकाचे एक बक्षिस जाहीर झाले आहे.२१ ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्र तेजस्विनी या मासिक सोडतीमधून ढग- ०२/३९२० या मातेश्री एन्टरप्रायजेस, खामगांव व ढग- ०७/९९६८ न्यु जय अंबे लॉटरी भंडार, यवतमाळ यांचेकडून विक्री झालेल्या तिकिटास रु.५ लाखाची प्रथम क्रमांकाची दोन बक्षिसे जाहीर झाली आहेत.२२ ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्र गजराज या मासिक सोडतीमधून ऋग- ०१/१५८५ या महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर यांचेकडून विक्री झालेल्या तिकिटास रक्कम रु.५ लाखाचे प्रथम क्रमांकाचे एक बक्षिस जाहिर झाले आहे. तसेच महा. सागरलक्ष्मी ते महाराष्ट्रलक्ष्मी या साप्ताहिक सोडतीमधून रू. ८ लाखाचे प्रथम क्रमांकाचे एकूण ६ बक्षिसे जाहीर झाली आहेत.याशिवाय ऑक्टोबर-२०२५ मध्ये मासिक व भव्यतम सोडतीतून १७३८३ तिकीटांना रु. १,३९,०५,५५०/- व साप्ताहिक सोडतीतून ५८०६९ तिकीटांना रू. १,९२,५२,१००/- ची बक्षिसे जाहीर झाली आहेत.सर्व खरेदीदारांनी महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या वेबसाईटवर नमूद प्रक्रिया पूर्ण करून रक्कम रू. १०,०००/- वरील बक्षिसाची मागणी या कार्यालयाकडे सादर करावी. रक्कम रू. १०,०००/- च्या आतील बक्षिस रकमेची मागणी विक्रेत्यांकडून करण्यात यावी, असेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.



दैनिक आत्ताच एक्स्प्रेसचे फुलंब्री तालुका प्रतिनिधी सरफराज पटेल यांना त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विविध राजकीय आणि सामाजिक कार्यकर्ते तसेच समर्थकांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी फुलंब्री तालुका उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष कार्यालयात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष)चे फुलंब्री तालुका प्रमुख सोमिनाथ पाटील करपे, राजेंद्र ठोंबरे, अय्युब पटेल, राजेंद्र काळे, मुंडी वसईचे शिवसेना नेते काकासाहेब मोटे, कापडे साहेब, राजू तायडे आणि इतर उपस्थित होते व त्यांनी सरफराज पटेल यांना शुभेच्छा व्यक्त केल्या.

# राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये निवडणुकीच्या अनुषंगाने विविध मतदारसंघात ही सुट्टी

आत्ताच एक्सप्रेस

मुंबई / प्रतिनिधी/ महाराष्ट्रात नगरपरिषद आणि नगरपंचायत यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार असून, या दिवसासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघात सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. ही सार्वजनिक सुट्टी केवळ मतदानासाठीच नव्हे, तर मतदारांना मतदान प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी संपूर्ण वेळ देण्यासाठी असून, राज्यातील प्रशासनिक तसेच सार्वजनिक उपक्रमांवर देखील त्याचा परिणाम होईल.

राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये निवडणुकीच्या अनुषंगाने विविध मतदारसंघात ही सुट्टी लागू होईल. या




जिल्ह्यांमध्ये पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, अहिल्यानगर, धुळे, जळगाव, नंदूरबार, नाशिक, कोल्हापूर, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर, बीड, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड, परभणी, अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर आणि वर्धा यांचा समावेश आहे.

सार्वजनिक सुट्टीचे उद्दीष्ट मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करणे, प्रशासनिक प्रक्रिया सुलभ करणे आणि मतदान केंद्रांवर गर्दी नियंत्रीत करणे आहे. या दिवशी मतदारसंघाच्या बाहेर असलेल्या नागरिकांनाही ही सुट्टी लागू होईल, ज्यामुळे ते त्यांच्या मतदान केंद्रावर सहज पोहोचू शकतील. तसेच नगरपरिषद आणि नगरपंचायत क्षेत्रातील केंद्र शासनाच्या शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका, तसेच इतर महत्त्वाच्या कार्यालयांवरही ही सार्वजनिक सुट्टी लागू होईल.

सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचनेनुसार, या दिवशी शासकीय कर्मचाऱ्यांना देखील सुट्टी राहील, ज्यामुळे मतदान प्रक्रियेसाठी आवश्यक प्रशासनिक कामकाजावर परिणाम होणार नाही. मतदारांनी त्यांच्या मतदान हक्काचा पूर्णपणे उपयोग करावा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासात सहभागी व्हावे, यासाठी प्रशासनाने ही सुवर्णसंधी निर्माण केली आहे.निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाने मतदान केंद्रांवर सुरक्षा व्यवस्था, मतदान सहाय्यक, मतदान यंत्र आणि इतर सुविधा याची पूर्ण तयारी केली आहे. मतदारांनी आपला मतदान अधिकार ओळखून, मतदानासाठी आवश्यक ओळखपत्र आणि आवश्यक कागदपत्रे साथ ठेवणे गरजेचे आहे. तसेच, नागरिकांनी मतदानास उपस्थित राहून आपल्या मताचा प्रभावी उपयोग करणे महत्त्वाचे आहे.

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस



# राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व मनोहर जोशी

राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांची आज जयंती आहे. २ डिसेंबर १९३७ रोजी अत्यंत गरीब कुटुंबात जन्मलेले मनोहर जोशी हे जीवनप्रवासाने प्रेरणादायी आहेत. त्यांनी आपल्या आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर कष्ट, निष्ठा आणि समर्पण यांचे अप्रतिम उदाहरण दिले.शिवसेनेची स्थापना १९६६ साली झाली आणि १९६७ साली मनोहर जोशींनी या पक्षात प्रवेश केला. त्यामुळे ते शिवसेनेच्या पहिल्या पिढीतील नेत्यांपैकी एक ठरले. त्यांनी शिवसैनिक म्हणून पक्षाच्या पहिल्या संघर्षकाळात हिरीरीने भाग घेतला आणि पक्षाची घडण प्रक्रिया पाहिली. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक आंदोलनांना दिशा मिळाली आणि त्यांचे संघटन कौशल्य उजळून आले. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांना त्यांच्या अत्यंत विश्वासू आणि निष्ठावंत साथीदारांपैकी एक मानले.१९९५ साली शिवसेना-बाजपा युती सत्तेत आल्यावर मनोहर जोशी यांना थेट महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनवण्यात आले. १४ मार्च १९९५ ते ३१ जानेवारी १९९९ या कालावधीत त्यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी आणि प्रशासनात पारदर्शकतेसाठी महत्त्वपूर्ण पाऊले उचलली. त्यांच्या कार्यकाळात सामाजिक न्याय, शैक्षणिक सुधारणा आणि उद्योग व रोजगार वाढीसाठी अनेक उपक्रम राबवले गेले.

मुख्यमंत्रीपदानंतर, ते केंद्र सरकारमध्ये मंत्री झाले. १९९९ ते २००२ या काळात अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय मंत्री म्हणून त्यांनी देशाच्या प्रशासनात आपली छाप सोडली. २००२ ते २००४ या काळात ते लोकसभेचे अध्यक्ष होते, ज्या काळात त्यांनी संसदेत सभापती म्हणून समन्वय, शिस्त आणि आदर यांची जोपासना केली.

मनोहर जोशी हे राजकारणात असूनही सर्वांशी मैत्रीपूर्ण आणि आदरयुक्त संबंध ठेवणारे नेता होते. विरोधी पक्षाचे नेत्यांनाही त्यांच्याबद्दल आदर होता, म्हणूनच त्यांना अजातशत्रू व्यक्तिमत्व म्हणून ओळखले गेले. मितभाषी, प्रेमळ आणि संयमी स्वभावामुळे ते सर्वांमध्ये लोकप्रिय राहिले.

राजकारणाबरोबरच त्यांनी व्यवसाय आणि शिक्षण क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. कोहिनूर इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून महाराष्ट्रातील असंख्य तरुणांना प्रशिक्षण दिले आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. त्यांनी शिवसेना काल - आज - उद्या हे पुस्तक लिहिले आहे, जे शिवसेनेच्या इतिहासाचे महत्त्वपूर्ण चरित्र मानले जाते.

मनोहर जोशी हे शिवसेनेच्या ५० वर्षांच्या चढ-उतारांचे साक्षीदार होते. १९६७ साली पक्षात प्रवेश करून अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी शिवसेनेला आपले जीवन समर्पित केले. बाळासाहेब ठाकरे त्यांना पंत म्हणून संबोधत. त्यांच्या निधनाने २३ फेब्रुवारी २०२४ रोजी ८७ व्या वर्षी शिवसेनेच्या कट्टर सेवकांचे एक युग संपले. राजकारणात असूनही त्यांनी मैत्री, विश्वास आणि निष्ठेच्या मूल्यांना प्राधान्य दिले. त्यांच्या जीवनातून प्रत्येकाला शिकण्यासारखे आहे की कष्ट, निष्ठा आणि संयम यांमुळेच व्यक्तिमत्वाची खरी महानता साधली जाते. आज जयंतीदिनी मनोहर जोशी यांना विनम्र अभिवादन!

# बॅडमिंटन क्रीडा स्पर्धा २०२५-२६ - महाराष्ट्राचा संघ जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**धर्माबाद/ प्रतिनिधी/**क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आदेशान्वये जिल्हा क्रीडा परिषद, छत्रपती संभाजीनगर आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये १४, १७ आणि १९ वर्षे वयोगटातील मुले राज्यस्तरीय शालेय बॅडमिंटन क्रीडा स्पर्धा २६ ते २९ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा, छत्रपती संभाजीनगर येथे यशस्वीरित्या संपन्न झाली.

सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या आठ विभागातील सुमारे २५०-३०० खेळाडूंमधून निवड समितीच्या मार्गदर्शनाखाली राज्यस्तरीय संघ आणि राखीव खेळाडू जाहीर करण्यात आले. निवड समितीमध्ये रितेश अनंतवार, हिमांशू गोडबोले, अतुल कुलकर्णी, मनोज कान्होरे, परीक्षीत पाटील, मिलिंद देशमुख यांची उपस्थिती होती. तसेच राज्यस्तरीय अधिकृत तज्ञ पंच म्हणून विजय भंडारे, श्रीरायु चौधरी, टंगसाळी सर, नचीकेत देशपांडे, निकुंज पांडे, देव कल्याणकर, वैष्णवी गुंडळे, आदित्य साळूंखे, कृष्णा सुर्यवंशी, तेजस जैन, अल्काम शेख, सार्थक वडवे यांचे सहकार्य मिळाले.

निवड झालेल्या १४ वर्षे वयोगटाच्या खेळाडू राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेसाठी १७-२१ डिसेंबर २०२५, सागर, मध्यप्रदेश येथे सहभागी होतील. तर १७ व १९ वर्षे वयोगटातील खेळाडू राष्ट्रीय स्पर्धेसाठी २-७ जानेवारी २०२६, दिल्ली येथे सहभागी होतील.स्पर्धेच्या यशस्वितेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच जिल्हा बॅडमिंटन संघटना, छत्रपती संभाजीनगर यांनी महत्वपूर्ण सहकार्य केले.

# प्रदूषणावर वेळीच नियंत्रण आणले नाही तर मोठा धोका उद्भवू शकतो:सावधान!

औद्योगिक क्षेत्रासह संपूर्ण क्षेत्रातील प्रदूषणावर नियंत्रण असने अती आवश्यक आहे.कारण भारतातील प्रदुषणाची पातळी दिवसेंदिवस वाढत आहे. औद्योगिकरण तसेच वैयक्तिक पातळीवर प्रदूषणाने अनेक ठिकाणी धोक्याची पातळी ओलांडल्याचे दिसून येते व यामुळे गंभीर परिणाम सुध्दा होतांना आपण पहातो.याचा विपरीत परिणाम मानव, पशु-पक्षी,जीव-जंतु,जीवसृष्टी, नैसर्गिक संसाधने, आणि हवामानावर होत आहे.यामुळेच आज आपल्याला स्थल,जल, वायू या तिन्ही ठिकाणी प्रदूषणाचा धोका वाढल्याचे दिसून येते.२ डिसेंबर १९८४च्या रात्री भोपाळ जवळील युनियन कार्बाईडच्या कारखान्यातून विषारी वायू गळती होऊन हजारो लोक मृत्युमुखी पडले.हा दिवस भारतसह जगासाठी काळीमा फासणारा ठरला.या दुर्घटनेची आठवण विशेषतः औद्योगिक क्षेत्रासाठी आणि यापुढे अशा घटना घडू नये यासाठी सर्वांनीच काळजी घ्यावी म्हणून २ डिसेंबर हा दिवस भारतात राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस म्हणून पाळला जातो.जगातील औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषणाशी संबंधित दुर्घटनांमध्ये भोपाळ वायू दुर्घटना सर्वात भीषण आणि महाभयानक समजली जाते.अशाच प्रकारच्या दोन घटना अमेरिकेतील थ्री माईल आयलॅड (१९७९) आणि रशियातील चेर्नोबिल (१९८६) या औद्योगिक क्षेत्रातील भयावह घटना घडल्या होत्या.म्हणजेच पृथ्वीसह संपूर्ण जीवसृष्टीला प्रदूषण विनाशाकडे नेतांना दिसत आहे.मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे मानवच प्रदूषणावर नियंत्रण ठेवु शकतो.नद्यांच्या काठावर मानवी संस्कृती विकसित झाली.पुढे त्या मानवाच्याच साक्षीने त्या-त्या पध्दतीने सांस्कृतिक धरोहर घोषित करण्यात आली.परंतु ज्या नद्यांच्या काठावर मानवाने आपले वास्तव्य बनवीले त्या नद्यांमध्ये दुषीत पाण्याचा लोंढा आपल्याला मोठ्या प्रमाणात दिसुन येतो.पाण्याच्या दृष्टीकोनातून नद्यांच्या अवतीभवती मोठमोठी गावे वसायची व त्या नद्यांच्या पाण्याचा उपयोग शेतीच्या कामासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी केला जात असे.परंतु आता परीस्थिती बदलेली दिसून येते. सध्याच्या परिस्थितीत नद्यांच्या अवतीभवती मोठमोठी औद्योगिक वसाहत पहायला मिळते.याच औद्योगिक क्षेत्रातील दुषीत पाणी नदीत सोडल्या जाते.त्यामुळे आपल्याला आजही अनेक मोठमोठ्या नद्या प्रदुषणाचा गंभीर मार झेलतांना दिसतात आणि यामुळे त्यांच्या आजूबाजूचा संपूर्ण परीसरात प्रदूषित झालेला दिसुन येतो.प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या सर्वेमध्ये असे लक्षात आले की देशातील प्रमुख नद्यांच्या १५० टापू प्रदूषीत असल्याचे सांगितले आहे.म्हणजेच नदि-नाले,तलाव, हवेतील वातावरण हे संपूर्ण प्रदुषणाकडे मोठ्या प्रमाणात वाटचाल करताना दिसत आहेत.याला मानवाने ताबडतोब रोखले पाहिजे अन्यथा अनर्थ होऊ शकतो याला नाकारता येत नाही. आज भारताची राजधानी दिल्ली प्रदुषणाचे माहेरघर बनली आहे.कारण कधी-कधी प्रदुषणाचे प्रमाण एवढे वाढुन जाते की शाळांना सुट्टी द्यावी लागते.कारण हिवाळ्यामध्ये वायू प्रदूषण अत्यंत धोकादायक स्थितीत येवून ठेपते.देशातील प्रदुषण फटाक्यांनी वाढते ही चुकीची कल्पना आहे.देशातील प्रदुषणामध्ये वाढ मुख्यत्वेकरुन औद्योगिकरण व वाहनांच्या दुषित धुरामुळे मोठ्या प्रमाणात होत आहे.फक्त दिवाळीचे एक-दोन दिवस फटाक्यांमुळे प्रदुषणात वाढ होते.त्याला फटाक्यांमुळे प्रदुषण झाले असे म्हणता येणार नाही. आज भारत प्रदुषणाच्या बाबतीत जगात आठव्या क्रमांकाचा प्रदुषित देश म्हणून गणना होते ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.भारतात प्रदुषण ही एक मोठी समस्या असुन भारतीय शहरात सरासरी पार्टिक्युलेट मॅटर(पीएम कण)२.५ हे ५३.३ मायक्रोग्रॅम आढळले.हे प्रमाण जागतिक आरोग्य संघटनेच्या सुरक्षित मर्यादेपेक्षा १० पट अधिक आहे. हा अहवाल स्वित्झर्लंडची संस्था आयक्यू एअरने दिनांक१४ मार्च २०२३ रोज मंगळवारलावर्ल्ड एअर क्वॉलिटी रिपोर्ट(जागतिक वायू गुणवत्ता अहवाल) नावाचा आपला अहवाल प्रसिद्ध केला. यावरून आपण समजू शकतो की प्रदुषणाच्या बाबतीत भारत अत्यंत गंभीर व धोकादायक स्थितीत आहे. जगातिल टॉप १०० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी ६५ शहरे एकट्या भारतातील आहेत.यात मुख्यत्वे करून दरभंगा, आसोपूर, पाटणा,नवी दिल्ली, कोलकाता,मुंबई,हैद्राबाद,बंगळूरु, चेन्नई यांचा समावेश आहे.त्यामुळे प्रदूषणाच्या बाबतीत भारताची चिंता दिवसेंदिवस वाढतच आहे.वाढत्या प्रदुषणाचे मुख्य कारण म्हणजे वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण, जंगलकटाई, सांडपाणी, मोठ्या प्रमाणात वाहनांचे आवागमन, हवाई वाहतूक इत्यादींमुळे आज पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवसृष्टीला धोका निर्माण झाला असून भयभीत आहे व यामुळे सर्वांचेच जगने अत्यंत कठीण झाले आहे.

परंतु २ डिसेंबर राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस या निमित्ताने सर्वांनीच प्रदूषणावर नियंत्रण आणण्याचा संकल्प केला पाहिजे.जी-२० परिषदेत सुध्दा जागतिक स्तरावर प्रदुषण नियंत्रणावर मोठ्या प्रमाणात चर्चा करण्यात आली.देशातील शहरीकरण रोखने, औद्योगिकरणावर नियंत्रण ठेवणे, भारतात सरकारी वाहने प्रदुषित धुळ जास्त ओकतात यावर अंकुश लागायला हवा.व देशातील जंगलतोड ताबडतोब थांबवून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला पाहिजे.वृक्षलागवड फक्त कागदावर नको तर कृतित व्हायला हवी.तेव्हाच आपल्याला प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यात यश प्राप्त होईल. अन्यथा गंभीर धोका निर्माण होऊ शकतो याला नाकारता येत नाही.सावधान!

**- लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**( स्वतंत्र पत्रकार ), नागपूर**

# निवडणुका लांबणीवर ; उमेदवार आर्थिक,मानसिक विवंचनेत

**आत्ताच एक्सप्रेस**

**धर्माबाद/ प्रतिनिधी/** गंगाप्रसाद सोनकांबळ/स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये नवीन वळण घेण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. मतदानासाठी फक्त दीड दिवसाचा कालावधी शिल्लक असताना निवडणूक आयोगाने अचानक आदेश काढला असून, ज्याठिकाणी अध्यक्ष पदासाठी अपील प्रलंबित आहे, त्या ठिकाणच्या २ डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीचे मतदान स्थगित करण्यात आले आहे. आयोगाने ही निवडणूक येत्या ४ डिसेंबर रोजी सुधारित कार्यक्रमानुसार घेण्याचे सुचित केले आहे. या निर्णयामुळे सर्वसामान्य उमेदवार अडचणीत सापडले आहेत आणि त्यांना निवडणूक तयारी पुन्हा नव्याने करावी लागणार आहे.

या अचानक बदलामुळे उमेदवारांचे आर्थिक तसेच मानसिक नुकसान गंभीर स्वरूपाचे आहे. निवडणूक प्रक्रियेत खर्च, प्रचार, कर्मचार्यांचे व्यवस्थापन, पोस्टर, प्रचार साहित्य, वाहने आणि अन्य खर्च यांचा विचार करता, या स्थगितीमुळे अनेक उमेदवारांचे अर्थसंकल्प कोलमडत असल्याचे दिसत आहे. फक्त आर्थिकच नाही, तर मानसिक तणाव आणि असमाधानही या निर्णयामुळे उमेदवारांना सहन करावे लागत आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बहुतेक सामान्य कार्यकर्त्यांच्या प्रतिनिधित्वासाठी होणाऱ्या निवडणुकांमध्ये मोडतात. मागील चार वर्षांपासून स्थगित असलेल्या निवडणुका अखेर कसाबसा वाजण्याच्या तयारीत होत्या, परंतु मतदानाच्या अगदी तोंडावर अचानक स्थगिती ही ऐतिहासिक अनपेक्षित घटना ठरली आहे. या पार्श्वभूमीवर उमेदवार, पक्ष कार्यकर्ते आणि नागरिक यांमध्ये निषेधाची लाट निर्माण झाली आहे. लोकशाही प्रक्रियेच्या दृष्टिकोनातून हे अचानक स्थगितीचे आदेश अनेकांना गैरवर्तन आणि असमाधानजनक वाटत आहेत.

धर्माबाद नगर परिषदे अंतर्गत सदस्यपदांच्या आरक्षणाचा प्रश्नही या




घटनेत महत्त्वाचा ठरला आहे. या आरक्षण व्यवस्थेच्या चौकटीत राहता येणे आवश्यक असताना, स्थगितीमुळे प्रक्रियेत अडथळा निर्माण झाला आहे. सोशल मीडियावर आणि स्थानिक चर्चेत अनेक नागरिकांनी यास 'लोकशाहीची हत्या' म्हणून उल्लेख केला आहे. आयोगाच्या निर्णय प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित होत आहेत, तसेच निर्णय घेण्याच्या वेळेच्या तातडीबाबत संताप व्यक्त केला जात आहे.

सर्वसामान्य उमेदवारांसाठी ही वेळ आर्थिक, मानसिक आणि सामाजिक दृष्ट्या आव्हानात्मक ठरली आहे. आता सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार तयारी करणे आणि पुन्हा प्रचार मोहीम सुरू करणे ही एक कठीण जबाबदारी ठरणार आहे. नागरिक आणि पक्ष कार्यकर्त्यांकडून निवडणूक आयोगाच्या या निर्णयावर सतत लक्ष ठेवले जात आहे, तसेच भविष्यात अशा अचानक बदलांच्या परिणामांना कसा टाळता येईल याबाबत चर्चा सुरु झाली आहे.

## गंगुबाई कारभारी चव्हाण यांच्या दुःखद निधनाने बाभुळगाव परिसरात हळहळ



**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर /प्रतिनिधी/**
गंगापूर तालुक्यातील बाभुळगाव (नांगरे) येथील रहिवासी गंगुबाई कारभारी चव्हाण (वय ७०) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बाभुळगाव येथील राहत्या घरी अंत्यसंस्कार करण्यात आले.

मनमिळाऊ आणि प्रेमळ स्वभावामुळे त्या पंचक्रोशीत प्रिय होत्या. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

त्यांच्या पश्चात पती, दोन मुलगे, सुना, सहा मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. प्रगतशील शेतकरी संतोष चव्हाण व मंगेश चव्हाण यांच्या त्या मातोश्री असून पत्रकार गुलाब वाघ यांच्या त्या आत्या होत.

# डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी माणूस घडवला?

येत्या दिनांक सहा तारखेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महान व्यक्तीचा महापरीनिर्वाण दिन. समस्त जगाला तत्वज्ञान देणारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे याच दिवशी वैदिक, जैन आणि इतर धर्मानुसार आपली इहलोकाची यात्रा संपवून स्वर्गलोकी गेले. परंतु ते स्वर्ग व नरक मानत नव्हते. त्यामूळे त्यांच्याबाबतीत ते स्वर्गात गेले. असा उल्लेख करता येत नाही.डॉ. बाबासाहेब त्या गोष्टींना मानत नाहीत की स्वर्ग आहे व नरक आहे. माणूस मरण पावला की त्यांच्या त्यांच्या कर्मानुसार स्वर्गात वा नरकात जातो. आपलं कर्म जर चांगले नसतील तर माणूस नरकात जातो. जिथं माणसाच्या आत्म्याला तेलात तळलं जातं, आगीत भाजलं जातं. त्याला कितीतरी दिवस उपाशी ठेवलं जातं. या साऱ्याच गोष्टी केल्या जातात. तसेच माणसांचे कर्म जर चांगले असतील तर त्यांच्या आत्म्यांना स्वर्गात पाठवलं जातं. जिथं सुखच सुख असतं.

काही धर्मग्रंथही बाबासाहेब ज्या गोष्टी मानत नाहीत, त्याच गोष्टी सांगतात नव्हे तर त्यात तशा स्वरुपाचं लिहूनही ठेवलं आहे. परंतु ते लिहिलं कोणी? यावर संशोधन केलं असता आपल्याला जाणवतं की ते एका जीवंत माणसानंच लिहून ठेवलं.

जो कधीच मरुन जीवंत झाला नव्हता. मात्र मानलं जातं की त्यानं तपश्चर्या केली. ज्यातून त्याला आत्मा, परमात्माचा बोध झाला. मग समजलं की आत्मा आहे, परमात्मा आहे. त्यानंतर तेच तत्वज्ञान त्यानं जगाला सांगीतलं व जगही भोळंच होतं मेंढरासारखं. त्या जगानं त्याच गोष्टीवर विश्वास केला. कारण ज्या व्यक्तीनं ते तत्वज्ञान सांगीतलं. तो हुशार होता आणि ज्या व्यक्तीनं ते तत्वज्ञान ऐकलं. तो अडाणी होता. त्या अडाणी माणसाला वाटलं की खरंच प्रत्यक्ष परमात्मा व आत्मा असू शकतो.

आत्मा, परमात्मा, स्वर्ग, नरक या गोष्टी जगात नाहीत. देव, भूत हेही जगात नाहीत आणि कोणी तसा दावा जरी केला तरी त्याला प्रत्यक्ष पुरावे नाहीत. आज न्यायालयातही एखादा खटला लढत असतांना पुरावे लागतात. मग स्वर्ग, नरक, आत्मा, परमात्मा आहे. हे मानायला प्रत्यक्ष पुरावे हवे नाहीत का? हेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचं म्हणणं. मग स्वर्ग व नरक या भ्रामक कल्पना आहे किंवा नाही, देव व भूत आहे किंवा नाही, आत्मा, परमात्मा आहे किंवा नाही. हे काही माहीत नाही. परंतु जी मंडळी त्यावेळेस त्या गोष्टी आहेत. असे मानत होते. त्यांनी त्या गोष्टी नाहीत, असं मानणाऱ्या डॉक्टर बाबासाहेबांना त्या गोष्टी प्रत्यक्ष पुराव्यांनी का दाखवल्या नाहीत? डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी त्या गोष्टी मानल्याच नाहीत.

म्हणूनच ते महान ठरले. त्यांचं म्हणणं वास्तविक स्वरुपाचं होतं व ते खरंही आहे. कारण आत्मा व परमात्मा हा कोणीही पाहिलेला नाही व तो नाहीच. कारण तत्कालीन काळात पुजा पाठ करणारे अस्पृश्य. त्या अस्पृश्यांनी देवांच्या सेवेचे कार्य केले. ते चांगले कार्य होते. त्यांनी कोण्या स्पृश्यांच्या घरी बाळंतपण असेल, तर त्यांना मदत केली. कोणा स्पृश्यांचे पाय उन्हानं जळत असतील तर त्यांना पादत्राणं दिलीत. लोकांच्या जीभेचे चोचले पुरविण्यासाठी त्यांनी पशूही कापले. एवढंच नाही तर लोकांच्या घरचा मैलाही साफ केला. लोकांच्या घरची मेलेली जनावरं ओढली.

अस्पृश्य लोकांनी सेवा केली. लोकांची तर केलीच. परंतु देवाचीही केली. म्हणूनच डॉक्टर बाबासाहेब म्हणतात की आम्ही स्वर्ग, नरक मानत नाही. देवालाही आम्ही मानलं असतं. जर देवानं आम्हाला आमच्याच जीवंतपणी माणूस म्हणून जगायची संधी दिली असती तर. परंतु आमच्या कित्येक पिढ्या, कित्येक वर्षापासून तशाच्या तशाच आहेत व त्या पिढ्या विटाळाच्या विळख्यात जगत आहेत. देव जर अंतर्यामी आहे तर त्या देवाला आमचं जगणं दिसत नाही काय? आजही आम्ही जनावरे ओढतो. स्पृश्यांच्या घरची बाळंतपणं करतो.

त्यांच्या पायांना त्रास होवू नये म्हणून पादत्राणे देतो नव्हे तर त्यांच्या जीभेचे चोचले पुरावेत म्हणून आम्ही पशुंचे जीव घेतो. आम्ही जेही काही करतो, ते सर्व स्पृश्यांसाठीच करतो. मग जर ते पाप असेल तर ते स्पृश्यांसाठी करावं लागत असल्यानं त्याची शिक्षा त्यांनाच व्हावी. आम्हाला नाही. देवानं त्यांना द्यावी. परंतु आज स्पृश्य हे आनंदात जगतात आणि आमची सेवा करणारी पिढी ही दुःखमय जीवन जगते. कारण परमात्मा नाही. अन् आत्माही नाहीच. कारण आत्मा जर असती तर त्या आत्मांनी लोकांना छळलं असतं. त्यातच त्या आत्म्यानं स्पृश्यांना जास्त छळलं असतं. कारण जीवंत असणारे जास्त प्राणी तेच खातात. त्याच जीवंत असणाऱ्या प्राण्यांना खाण्यासाठी तेच मारत असल्यानं त्या प्राण्यांच्या मृत आत्म्यांनी त्यांनाच छळायला हवं होतं. परंतु तसं घडत नाही. यावरुन आत्मा परमात्मा व स्वर्ग नरक नाहीच.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी माणसांना आत्मा, परमात्मा मानायला लावलं नाही. त्यांना खऱ्या अर्थानं माणूस बनवलं. कारण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर होण्यापुर्वी अस्पृश्यांना पोटभर जेवनच मिळत नसल्यानं त्यांनी कच्चे कुजलेले मांस खाल्ले. उष्ट्या पत्रावळीही चाटल्या. जनावरांचं खाणंही त्यांनी खाल्लं. परंतु ज्यावेळेस डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा उदय झाला. त्यावेळेपासून तमाम अस्पृश्य समाज हा चांगले सुग्रास अन्न खातो. तेही पोटभर खातो. जे माणसाचं लक्षण आहे. त्यातच त्यांच्या जन्मापुर्वी अस्पृश्य माणसं पशुसारखेच राहायचे. त्यांना नीट वापरायलाही अंगावर कापडही मिळायची नाहीत. लहान मुलं तर बरीच मोठी होईपर्यंत उघडी नागडीच राहायची. परंतु बाबासाहेबांच्या जन्मानंतर त्यांच्या समाजाला चांगले भरजरी कपडे मिळाले. तसंच त्यांच्या जन्मापुर्वी जे घर राहण्यासाठी नशीबात नव्हतं. काट्याकुट्याच्या झोपडीत राहावं लागायचं. ज्या झोपडीत चारही बाजूंनी ऊन, वारा, पाऊस लागायचा. ते घरही त्यांच्या जन्मानंतर चांगलं सुसज्ज बनलं. अर्थात बाबासाहेबांनी माणूस घडवला. पशू नाही.

डॉक्टर बाबासाहेबांनी जो माणूस नावाचा ओबडधोबड पशुसारखा वागणारा पुतळा होता. त्या पुतळ्याला सुबक आकार दिला व त्या पुतळ्यात चांगले विचार भरलेत. ज्या विचारांची जगाला गरज होती. त्याच तत्वज्ञानाच्या भरवशावर तो माणूस जगाची भ्रमंती करु लागला. आपले तत्वज्ञान सांगू लागला. परंतु तो पुतळा एवढा हुशार बनला की आज तोच पुतळा बाबासाहेबांना केवळ ओठावरच ठेवतो. मनात ठेवत नाही. आज त्या पुतळ्यात विचार स्वातंत्र्य आल्यानं तो अधिकच स्वार्थी झालाय. आता तोच पुतळा बाबासाहेबांच्या विचारांना मानत नाही. भ्रष्टाचार करतोय. तोच पुतळा आज अधिकच देवादिकांच्या सानिध्यात शिरलाय. त्यातच तो देवादिकांच्या सानिध्यात शिरला असला तरी देवादिकांना भीत नाही.

एवढंच नाही तर जे बाबासाहेबांना अभिप्रेत नव्हते. तेच तो पुतळा करु लागला आहे, बाबासाहेबांच्या महापरीनिर्वाणानंतर. त्यातच तो पुतळा जुने दिवस विसरलाय की आपली पिढी पुर्वी कशी राहात होती. तो पुतळा आताही देवादिकातच रमतोय. आत्मा परमात्मा मानतोय. एवढंच नाही तर अंधश्रद्धाही पाळतोय. अन् इतरांना पाळायलाही सांगतोय.

महत्वाचं म्हणजे डॉक्टर बाबासाहेबांपुर्वी या पृथ्वीवर आत्मा परमात्मा अस्तित्वात होता. तो आपल्याच पुर्व पिढीनं अस्तित्वात आणला होता. त्याचं कारण होतं, माणसानं माणसासारखं वागणं. तो माणसासारखा वागावा, म्हणूनच त्याला भीती दाखवली होती आत्म्या परमात्म्याची. त्यातच भूत आणि देवाची. स्वर्ग नरकही सांगीतला. होता आपल्या पुर्वजांनी. माणसानं आपले चांगले वर्तन ठेवावे. इतरांशीही माणूसकी व्यक्त करावी ही भावना होती. अन् तसं सांगणं वा तशी भीतीही दाखवणं गरजेचं होतं. माणूसफण जगविण्यासाठी. कारण तेव्हा ना कायद्याचं राज्य होतं, ना संविधान होतं.

डॉक्टर बाबासाहेबांनी माणूस घडवला. अंधश्रद्धा दूर केल्या. आत्मा परमात्मा दूर सारला. स्वर्ग नरकाला भ्रामक कल्पना मानल्या. कारण आज संविधान आहे व लोकं संविधानाच्या ताकतीला घाबरतात. तरीही काही लोकं कायदे मोडतातच. कायद्याला विकत घेवून. कायदा हा न्यायालयात विकला जातो. काही वकील मंडळी विकत असतात कायदे. अन् त्याला मदत काही न्यायाधीश मंडळीही करीत असतातच. जरी बाबासाहेबांनी स्वर्ग, नरक, आत्मा, परमात्मासारख्या भ्रामक कल्पना दूर सारल्या असल्या तरी.

हा भारत....... हा भारत विकसनशील विचारांचा व लिखीत संविधानाचा देश आहे. हा विचारी देश आहे. तसा इंग्लंड नाही व आजही इंग्लंडमध्ये अलिखीत संविधान आहे. जसा भारत पुर्वी होता तसा. आजही इंग्लंडमधील लोकं लिखीत संविधान असलं तरी सौजन्यानं व परीवर्तनशील विचारानं वागतात आणि भारतातील काही मंडळी हे बाबासाहेबांनी देशाला संविधानाची लिखीत ताकद दिली तरी धोंडच वागतात. त्यातच काही आत्मा, परमात्मा मानतातच. स्वर्ग नरक मानतातच. अन् मानायलाही हवं. परंतु जे मानत नाहीत. त्यांनी संविधानाला तरी घाबरायला हवं. माणूसपण जोपासण्यासाठी.

याचसाठी बाबासाहेबांनी आपल्याला संविधानरुपी दुहेरी कवच दिलं. पहिलं कवच आपल्या पुर्वजांनी आत्मा, परमात्मा, स्वर्ग, नरक सांगून तर दुसरं कवच संविधान रुपानं. विशेष म्हणजे आज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आपल्यात नाहीत. त्यांचं महापरीनिर्वाण झालेलं आहे. परंतु त्यांनी एक प्रकारची देणगी दिली आहे. त्याच देणगीचा आधार घेवून लोकांनी सुधरावं. आपलं आचरण सुधरवावं. एकमेकांना सुधरवावं. माणूस बनावं. जेणेकरुन माणूसकी आपल्यात कुटकूट भरता येईल. इतरांनाही माणसासारखं वागता येईल. वागवता येईल. कारण आपण तसं जर वागलो नाही आणि इतरांना वागवलं नाही तर आपल्यात व पशुंमध्ये काहीच फरक उरणार नाही. हे तेवढंच खरं.

**-अंकुश शिंगाडे ,नागपूर**

# कापूस, सोयाबीन, मका हमी भावाने विक्री कपास किसान' व 'ई- समृद्धी'पवर नोंदणीची सुविधा

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** हंगाम सन २०२५-२६ मध्ये हमीभावाने कापूस व सोयाबीन, मका विक्री करण्यासाठी भारतीय कापूस निगम लिमिटेड यांनी कापूस उत्पादक शेतकऱ्यांना पूर्व नोंदणी करण्यासाठी कापूस किसान मोबाइल ॲप्लिकेशन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तर सोयाबीन विक्रीसाठी ई समृद्धी पवर तर मका करीता स्वतंत्र लिंकवर नोंदणीची सुविधा उपलब्ध असून शेतकऱ्यांनी नोंदणीसाठी प सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

यासंदर्भात आज प्रधान सचिव सहकार व पणन



यांनी दुरदृष्य प्रणालीद्वारे आढावा घेतला. शेतकऱ्यांना आपला कापूस, सोयाबीन ही पिके हमी भावाने विकता यावी यासाठी ही सुविधा शासनाने उपलब्ध करुन दिली आहे.त्यासाठी कापूस विक्रीसाठी कपास किसान प तर सोयाबीन विक्रीसाठी ई समृद्धी या मोबाईल पवर नोंदणी करता येणार आहे.

कपास किसान ॲपद्वारे शेतकऱ्यांच्या जमिनींची नोंदी आणि कापूस लागवड क्षेत्रात तपशीलाची पडताळणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याकरिता व राज्यातील कापसाची आधारभूत किंमतीने खरेदीची कार्यवाही प्रभावी व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी आवश्यक उपयोजना करण्यासाठी कापूस उत्पादक क्षेत्रात तालुकास्तरीय नोडल अधिकारी नियुक्त केले आहेत.

**कापूस खरेदीसाठी ८ केंद्र**

महाप्रबंधक, भारतीय कापूस निगम लिमिटेड छत्रपती संभाजीनगर यांनी किमान आधारभूत किंमत योजना अंतर्गत सन २०२५-२६ या हंगामामध्ये भारतीय कापूस निगम लिमिटेड यांच्या मार्फत कापूस खरेदीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार स्थानिक निगराणी समिती (Local Monitoring Committee) स्थापन केली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये ६ तालुक्यात (पाचोड व बालानगर,ता.पैठण, सिल्लोड, सोयगाव, शिऊर बाजार, ता. वैजापुर, खामगाव ता. फुलंब्री, गंगापुर व लासूर ता. गंगापुर) ०८ कापूस खरेदी केंद्रे आहेत.

**सोयाबीन खरेदीसाठी ११ केंद्र**

तसेच छत्रपती संभाजीनगर, गंगापुर, वैजापुर, खुलदाबाद, कन्नड, सोयगाव, सिल्लोड, फुलंब्री व संत ज्ञानेश्वर कृषी सेवा सहकारी संस्था असे एकूण ०९ ठिकाणी तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाचे सोयाबीन खरेदी केंद्र आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील किमान आधारभूत दरानुसार नोंदणी / छउउक्र मार्फत हंगाम २०२५-२६ करीता सोसायटी विक्रेत्यासाठी कृषि उत्पन्न बाजार समिती सिल्लोड व आकाश ग्रो शेतकरी उत्पादक कंपनी असे एकूण दोन ठिकाणी सोयाबीन नोंदणी सुरु आहे.

**मका खरेदीसाठी ११ केंद्र**

तसेच छत्रपती संभाजीनगर, गंगापुर, लासूर स्टेशन, वैजापुर, खुलदाबाद, कन्नड, सोयगाव, सिल्लोड, फुलंब्री व संत ज्ञानेश्वर कृषी सेवा सहकारी संस्था, पाचोड व वीर महिला क्रांती शेतकरी कंपनी शिवना असे एकूण ११ ठिकाणी तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाचे मका खरेदी केंद्र आहेत.या ठिकाणी मका नोंदणी सुरु आहे. त्यासाठी शासनाने स्वतंत्र लिंक दिली आहे. https://mspbeam.in/accounts/signin या लिंकवर जाऊन शेतकऱ्यांनी आपल्या मका पिकाची नोंदणी करावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

**पूर्वनोंदणी करण्याचे आवाहन**

त्यानुसार हमीदराने कापूस विक्री करण्यासाठी भारतीय कपास निगम लिमिटेड यांनी कापूस उत्पादक शेतकऱ्यांना पूर्व नोंदणी करण्यासाठी कपास किसान मोबाइल ॲप्लिकेशन तसेच सोसायटी नोंदणीसाठी ई-समृद्धी ॲपवर तसेच शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये ऑनलाइन नोंदणी आवश्यक आहे,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

शेतकऱ्यांनी अधिक माहितीसाठी जवळच्या नोंदणीकृत खरेदी केंद्राशी संपर्क साधावा,असेही आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस दिनांक-०२/१२/२०२५

CHANGE OF NAME

I AM CHANGING MY NAME FROM
OLD NAME
**NIKITA KANCHAN CHATE**
TO,
NEW NAME
NIKITA KANCHANKUMAR CHATE
AS PER MY DOCUMENTS
**ADDRESS-Plot no.84 & 85,S.no.68, Sant Tukoba Nagar, N-2 Cidco, Chhatrapati Sambhajinagar-431003**

दैनिक निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस दिनांक-०२/१२/२०२५

CHANGE OF NAME

I, NIKITA KANCHANKUMAR CHATE IS CHANGING MY FATHERS NAME FROM
**OLD NAME**
**KANCHAN DASRATHRAO CHATE**
TO,
**NEW NAME**
**KANCHANKUMAR DASHRATHRAO CHATE**
AS PER MY DOCUMENTS
**ADDRESS-Plot no.84 & 85,S.no.68, Sant Tukoba Nagar, N-2 Cidco, Chhatrapati Sambhajinagar-431003**

दैनिक निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस दिनांक-०२/१२/२०२५

CHANGE OF NAME

I,NIKITA KANCHANKUMAR CHATE IS CHANGING MY MOTHERS NAME FROM
**OLD NAME**
**SHIVKANYA KANCHAN CHATE**
TO,
**NEW NAME**
**SHIVKANYA KANCHANKUMAR CHATE**
AS PER MY DOCUMENTS
**ADDRESS-Plot no.84 & 85,S.no.68, Sant Tukoba Nagar, N-2 Cidco, Chhatrapati Sambhajinagar-431003**

# जप, तप, यज्ञ आणि अन्नदानाचा अखंडित पर्व जनशांती धर्मसोहळ्यात भाविकांचा आध्यात्मिक अनुभव





**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/ प्रतिनिधी/** खुलताबाद तालुक्यातील क्षेत्र वेरुळ येथे संत जनार्दन स्वामी यांच्या ३६ व्या पुण्यस्मरणानिमित्त सुरू असलेल्या 'ॐ जगद्गुरु जनशांती धर्म सोहळ्या'ची आज (दि. २ डिसेंबर) मंगल सांगता होत आहे. २५ नोव्हेंबरपासून सुरू झालेला हा भव्य सोहळा महामंडलेश्वर शांतिगिरी महाराज आणि सोहळा समन्वयक राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत भक्तिभावाने पार पडत आहे.गत आठवडाभर आश्रम परिसरात जप, तप, यज्ञ आणि अन्नदानाची अखंडित परंपरा सुरू असून भाविकांना अनोखा आध्यात्मिक अनुभव मिळत आहे. संत जनार्दन स्वामी आश्रमाच्या विस्तीर्ण परिसरात छत्रपती संभाजीनगर, जालना, नाशिक, धुळे, जळगाव, अहिल्या नगरी अशा विविध जिल्ह्यांतून 'जय बाबाजी' भक्त परिवार दर्शन आणि जपानुष्ठानासाठी मोठ्या संख्येने दाखल झाला आहे.

**७५१ कुंडांमध्ये सव्वा पाच क्विंटल तुपाने हवन**

या भव्य धर्मसोहळ्यात ७५१ कुंडांमध्ये महायज्ञ आयोजित करून सुमारे सव्वा पाच क्विंटल तुपाद्वारे हवन करण्यात आले. यंदा जपानुष्ठानाद्वारे १ कोटी ११ लाख जप पूर्ण करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

सोहळ्याची सांगता आज सायंकाळी बाबाजींच्या पादुकांची मिरवणूक, मुख्य प्रवचन आणि जपानुष्ठानकर्त्यांचा उपवास सोडवण्याने होणार आहे. यासाठी आश्रम परिसरात ११ क्विंटल बुंदी व मसालेभाताची तयारी युद्धपातळीवर सुरू होती.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते सोहळ्याचा शुभारंभ

या आध्यात्मिक महासोहळ्याचा शुभारंभ राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला होता. गेल्या आठ दिवसांत देशातील अनेक संत-महंत व मान्यवरांनी भेट देऊन शांतिगिरी महाराजांचे आशीर्वाद घेतले.

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि फुलंब्रीच्या आमदार अनुराधा चव्हाण यांनीही सोहळ्यास भेट दिली. सकाळच्या सत्रात जम्मू-काश्मीर येथील अटल आखाड्याचे पिठाधीश्वर महामंडलेश्वर श्री श्री १००८ स्वामी विश्वात्मानंद सरस्वती महाराज यांनी सहभाग नोंदविला.

सोहळ्याच्या पूर्वसंध्येला रात्रीच्या सत्रात राजेश सरकटे प्रस्तुत स्वर विहार मंचाने बाबाजींची सुमधुर भजने सादर करून भक्तांना मंत्रमुग्ध केले.

**'सर्वांनी उपस्थित राहून आशीर्वाद घ्यावा' - राजेंद्र पवार**

आज अंतिम दिवशी बाबाजींच्या पादुकांची मिरवणूक आणि सांगता कार्यक्रम पाहण्यासाठी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने समन्वयक राजेंद्र पवार यांनी केले आहे.

# गळ्याला चाकू लावून लुटले, आरोपील ५ तासांत अटक ३,७०,००० रुपयांचा माल जप्त

**आत्ताच एक्सप्रेस**

**बिडकीन /प्रतिनिधी/** पैठण तालुक्यातील बिडकीन येथे शुक्रवारी सायंकाळी एका धाडसिक चोरट्याने हिंसक मार्गाने चोरी केली. बिडकीन पोलिसांनी अवघ्या ५ तासांत आरोपीला अटक करून ३,७०,००० रुपयांचा माल जप्त केला.

माहितीनुसार, सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास, बिडकीन येथील पैठण रोडवरील एका हॉटेलजवळ तक्रारदार आपल्या कार (एम एच १४ जीएन ४४५३)मध्ये बसलेला होता. यावेळी, नांदलगाव येथील आरोपी कृष्णा माने अचानक तक्रारदाराजवळ आला आणि त्याच्या गळ्यावर चाकू लावून जीवे मारण्याची धमकी दिली. आरोपीने तडकाफडकी कार व त्यामधील रोख रक्कम २०,००० रुपये घेतली आणि कारसह पळ काढला. कारची किंमत अंदाजे तीन लाख रुपये असल्याची माहिती आहे.घटनेची माहिती तक्रारदाराने तात्काळ बिडकीन पोलिस ठाण्यात दिली. पोलिसांनी तत्काळ कारवाई सुरू केली आणि पीएसआय झिजुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली बिडकीन एपीआय नीलेश शेळके यांच्या देखरेखीखाली पाच तासांच्या आतच आरोपीला अटक केली. पोलिसांच्या त्वरित कारवाईमुळे चोरी केलेला संपूर्ण माल जप्त करण्यात आला.

आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३०९(४) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, जो व्यक्तीच्या जीवाला धोका निर्माण करणाऱ्या हल्ल्याशी संबंधित आहे. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये सुरक्षा वाढवण्याच्या महत्त्वाची जाणीव निर्माण झाली असून, पोलिसांच्या वेगवान आणि तत्काळ कारवाईमुळे गुन्हेगाराला पकडण्यात यश आले आहे.बिडकीन पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचा सल्ला दिला असून, कोणत्याही संशयास्पद व्यक्ती किंवा घटनांची माहिती तात्काळ पोलिसांना देण्याचे आवाहन केले आहे.

## जागतिक एड्स दिन विविध उपक्रमांनी साजरा



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जिल्हा रुग्णालयाच्या वतीने जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृतीपर विविध उपक्रम राबविण्यात आले. दि.१५ पर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत,असे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर यांनी कळविले आहे.जिल्हा रुग्णालयात आज सकाळी सायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीत जिल्हा सायकल संघटना, तेज्स्विनी सायकल क्लब, देवगिरी सायकलिंग क्लब आदी संस्था सहभागी झाल्या. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून सायकल रॅली मार्गस्थ करण्यात आली. अतिरिक्त जिल्हा शक्य चिकित्सक डॉ. भुषणकुमार रामटेके, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नारायण सावरगावेकर, डॉ. अनुपम टाकळकर, डॉ. पद्मजा सराफ, डॉ.प्रशांत बडे, डॉ. अपर्णा जक्कल, डॉ. मनिष भोंडवे, क्षयरोग अधिकारी डॉ. एम.टी.साळवे, डॉ. पंडीत किल्लारीकर, डॉ. दीपमाला परदेशी, श्रीमती साधना गंगावणे, , जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय पवार, जिल्हा पर्यवेक्षक विनोद मस्के, पंकज धुळे आदी उपस्थित होते.

डॉ.सकपाळ यांनी बाबा हिंदुस्थानी पथनाट्यातून जनजागृती केली. यावेळी एचआयव्ही, एड्स औषधोपचार सुविधा, सेवा देऊन उत्कृष्ट कार्य करणाऱ्य एआरटी केंद्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील अधिकारी- कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक जिल्हा कार्यक्रम अधिकारी साधना गंगावणे यांनी सुत्रसंचालन सुनिता बनकर यांनी तर आभारप्रदर्शन सिताराम विधाते यांनी केले.

## कौटुंबिक न्यायालयात राष्ट्रीय लोकअदालत दि.१३ रोजी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** कौटुंबिक न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांची राष्ट्रीय लोकदालत शनिवार दि.१३ रोजी होणार आहे. ही लोकअदालत कौटुंबिक न्यायालय इमारतीत सकाळी साडेदहा वा. होणार आहे, असे कौटुंबिक न्यायालयाचे प्रबंधक यांनी कळविले आहे.

## लोकशाही दिनी १८ अर्ज

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जिल्हास्तरीय लोकशाही दिन आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजीत करण्यात आला. यावेळी नागरिकांकडून १८तक्रारी अर्ज प्राप्त झाले. विभागनिहाय प्राप्त अर्ज याप्रमाणे - जिल्हा परिषद २, इतर निवेदन १६ याप्रमाणे एकूण १८ अर्ज प्राप्त झाले, असे सामान्य शाखेच्या उपजिल्हाधिकारी श्रीमती संगिता राठोड यांनी कळविले आहे.

# संक्षिप्त

## न.पा.निवडणूकःजिल्हाधिकाऱ्यांनी घेतला निवडणूक पूर्वतयारीचा आढावा

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जिल्ह्यातील नगरपालिका निवडणूकीसाठी उद्या मंगळवार दि.२ रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी जिल्ह्यातील सर्व नगरपालिका क्षेत्रात होत असलेल्या मतदान पूर्वतयारीचा आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आढावा घेतला.जिल्हा मुख्यालयातून दुरदृष्य प्रणालीद्वारे हा आढावा घेण्यात आला. उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, सहा. आयुक्त नगरपालिका प्रशासन ऋषिकेश भालेराव, जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी शेळके आदी उपस्थित होते. पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड तसेच सर्व निवडणूक निर्णय अधिकारी हे दुरदृष्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.मतदान केंद्रावरील व्यवस्था, कायदा सुव्यवस्था, प्रतिबंधात्मक क्षेत्र, आचारसंहिता अंमलबजावणी याबाबत सद्यस्थिती जाणून घेत जिल्हाधिकारी स्वामी यांनी सर्व अधिकारी - कर्मचारी यांनी समन्वय राखून मतदान प्रक्रिया पारदर्शक व निर्भय वातावरणात कशी पार पडेल यासाठी कार्य करावे,असे सांगितले.सर्व मतदान प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात नियंत्रण कक्ष तयार करण्यात येणार आहे. तेथून सर्व प्रक्रियेवर लक्ष ठेवले जाणार आहे,असेही यावेळी सांगण्यात आले.

## कामगार-कर्मचाऱ्यांना मतदानासाठी भरपगारी सुट्टी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार नगर परिषद नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या निवडणूकीचा कार्यक्रम घोषित असून जिल्ह्यातील नगरपरिषदांमध्ये निवडणूका होत आहेत. मंगळवार दि.२ रोजी होणाऱ्या नगर परिषद/ नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक-२०२५ करिता मतदार संघातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्याबाबत शासन आदेश निर्गमित झाला आहे. त्यानुसार, १.निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार/अधिकारी/कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी.२.ही सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू राहिल (उदा. खाजगी कंपन्या या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इ.)३. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत देता येईल. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी दोन तासांची सवलत मिळेल याची दक्षता आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.तसेच सर्व कामगार/अधिकारी / कर्मचारी यांना सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने दि.२ रोजी मतदान करता यावे याबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे तातडीने निराकारण करण्यासाठी कामगार अधिकारी सु. प्र. राजपुत (मोबाईल नंबर- ७८७५३९७३८२), सहा. नोडल अधिकारी गो. आ. गावंडे (मोबाईल नंबर- ८२७५२३८८३६), वि. ना. वैद्य दुकाने निरीक्षक (मोबाईल नंबर-९८६०३१९३५४ ),श. मा. राठोड, दुकाने निरीक्षक (मोबाईल नंबर- ८५३०७९३२४४) हे काम पाहणार आहेत.

# दुचाकीस्वाराची शासकीय वाहनाला धडक; ३२ वर्षीय तरुण गंभीर जखमी

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री/ प्रतिनिधी/**फुलंब्री तालुक्यातील डोंगरगाव कवाड परिसरात सोमवारी संध्याकाळी एका दुचाकीस्वाराने शासकीय पोलीस वाहनाला दिलेल्या धडकेत ३२ वर्षीय तरुण गंभीर जखमी झाला आहे. या प्रकरणी फुलंब्री पोलीस ठाण्यात संबंधित चालकाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, पोहेकॉ गोरे हे शासकीय बोलेरो (H«$. MH 20 CQ 2081) घेऊन नियमित पेट्रोलिंगवर होते. दरम्यान, शंकर नामदेव थोरात (रा. पिंपळगाव गांगदेव, ता. फुलंब्री) हे MH 20 CZ 6936 क्रमांकाची मोटरसायकल पालफाटा-पिंपळगाव रस्त्याने भरधाव वेगाने जात होते.

थोरात यांनी मद्यप्राशन करून, हयगयी व निष्काळजीपणे वाहन चालविताना समोरून येणाऱ्या शासकीय बोलेरोला उजव्या बाजूस जोरदार धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले असून उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातात पोलीस वाहनाचेही मोठे नुकसान झाले.

या प्रकरणी सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल कलम २७९, १२५(-), १२५(इ), ३२४ तसेच सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ च्या कलम ३ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# संक्षिप्त

## विधी स्वयंसेवकासाठी अर्ज करण्यास ९ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना व त्या अंतर्गत कार्यरत असणाऱ्या तालुका विधी सेवा समिती अंबड, परतूर, भोकरदन, जाफ्राबाद, बदनापूर, मंठा व घनसावंगी येथे विधी स्वयंसेवकांची नेमणूक करणे आहे. त्याकरिता दि. ०६/०८/२०२५ पावेतो अर्ज करण्यास मुदत होती. तरी अर्ज करण्याची मुदत दि. ९ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. विधी स्वयंसेवक म्हणून काम करण्यासाठी व्यक्ती, विद्यार्थी, आणि महिला उमेदवार अर्ज करु शकतात. असे आवाहन सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना यांनी केले आहे.

स्वयंसेवक म्हणून निवृत्त शिक्षक, एम.एस.डब्ल्यू विद्यार्थी व शिक्षक, अंगणवाडी सेविका, विद्यार्थी / कायद्याचे विद्यार्थी (जोपर्यंत ते वकील म्हणून नावनोंदणी करीत नाहीत तोपर्यंत). बिगर राजकीय सेवाकेंद्रित, बिगर शासकीय स्वयंसेवी संस्था व क्लबचे सदस्य, महिला गट/मैत्री संघ आणि दुर्लक्षित/दुबळ्या गटांसहित इतर स्वयंसहायता गटातील सदस्य, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा तालुका विधी सेवा समितीला विधी स्वयंसेवक म्हणून योग्य वाटेल अशी व्यक्ती विधी स्वयंसेवक म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीस कोणताही पगार, वेतन किंवा मोबदला दिला जाणार नाही फक्त वेळोवेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाद्वारे ठरवलेले मानधनच मिळेल. या नेमणुकीमुळे कायमस्वरूपी नोकरीला कोणताही हक्क प्राप्त होत नाही तसेच नेमणूक ही निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात आहे. उपरोक्त गटापैकी पात्र व्यक्ती/विद्यार्थी/महिला यांनी आपला अर्ज जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना व तालुका स्तरावरील तालुका विधी सेवा समिती येथे कार्यालयास प्रत्यक्ष भेट देवून दि. ९ डिसेंबर २०२५ पर्यंत द्यावा. संपर्क जिल्हा न्यायालय परिसर, अंबड चौफुली, जालना दुरध्वनी क्र. ०२४८२-२२३६२५, मोबाईल ८५९१९०३६२१ तालुका स्तरावरील सर्व दिवाणी व फौजदारी न्यायालय, अंबड, परतूर, भोकरदन, जाफ्राबाद, बदनापूर, मंठा व घनसावंगी येथे करता येईल. असे सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## २ डिसेंबर भोपाळ दुर्घटना दिन/राष्ट्रीय प्रदुषण प्रतिबंध दिन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** दरवर्षी २ डिसेंबर रोजी भोपाळ दुर्घटना दिन/राष्ट्रीय प्रदुषण प्रतिबंध दिन असतो. या अनुषगांने प्रदुषण प्रतिबंध उपाययोजना बाबत जनजागृती माहिती देण्यात येते. भोपाळ दुर्घटनाचा परिणाम आपल्या सर्वांना ज्ञातच आहे. युनियन कार्बाइड (इंडिया) लिमिटेड या कंपनीच्या टँकमधुन अत्यंत विषारी असा पेस्टिसाईड मिथाईल आयसोसायनाईट वायुच्या ४० टन गळतीमुळे ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेत जवळपास २०,००० लोकांचा मृत्यू झाला तसेच ५००००० पेक्षा जास्त जखमी अथवा अपंग झाले. प्रदुषण नियंत्रणाबाबतच्या नियमांना प्रसिध्दी देणे व नियमांची अंमलबजावणी करणे. स्वच्छ औद्योगिक प्रक्रियांना प्रोत्साहन देणे. कारखान्यातुन निघणारे सांडपाणी नदीमध्ये न सोडणे. प्रदुषणाच्या दुष्परिणामाबाबत जागरुकता वाढविणे. प्रदुषण दिसुन आल्यास तात्काळ कळविणे. प्रदुषणाचे संकट संपुर्ण जगामध्ये आहे. ध्वनी, हवा, जल प्रदुषण कसे प्रतिबंध करता येईल यावर उपाययोजना करण्यासाठी ०२ डिसेंबर रोजी राष्ट्रीय प्रदुषण प्रतिबंध दिन साजरा करण्यांत येतो. प्रदुषणापासुन मुक्ती मिळविण्यासाठीच्या उपायांवर चर्चा करणे. प्रदुषणाचा धोका कमी करणे याकरिता जनतेमध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे. प्रदुषण होणार नाही याची दक्षता घेऊ या. असे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### नगरपरिषदसार्वत्रिकनिवडणूक-२०२५

# कामगारांना मतदानासाठी भरपगारी सुट्टी देण्याचे आदेश जारी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** सर्व आस्थापना मालकांनी त्यांच्याकडील अंबड, भोकरदन, परतूर नगरपरिषद निवडणूक होणाऱ्या क्षेत्रात मतदार असलेल्या कामगारांना दि. २ डिसेंबर, २०२५ रोजी कामगार, अधिकारी - कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी सुट्टी महत्वाची आहे. तरी महाराष्ट्र शासन परिपत्रकातील आदेशानुसार जिल्ह्यातील अंबड, भोकरदन आणि परतूर नगरपरिषद निवडणूक क्षेत्रातील कामगारांना दि.२ डिसेंबर रोजी मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी देण्यात यावी, असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी अ.मा. जाधव यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.जिल्ह्यातील अंबड, भोकरदन, परतूर नगरपरिषद निवडणूक दि. २ डिसेंबर, २०२५ रोजी सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदानाच्या दिवशी मतदारांना मतदान करण्यासाठी सदरहू दिवशी सुट्टी सर्व निवडणूक क्षेत्रातील सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू राहिल (उदा. खाजगी कंपन्या या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्ये गृह, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इ.) या मधील कामगारांना दि. २ डिसेंबर, २०२५ रोजी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी जाहीर करावी. तसेच निवडणूक होणाऱ्या लगतच्या क्षेत्रात औद्योगिक वसाहती (एमआयडीसी) येथे मोठ्या नागरी वसाहती वसलेल्या आहेत. अशा ठिकाणी नोकरी निमित्ताने कामास येणाऱ्या संबंधित मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, या दृष्टीने मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टीची विशेष सवलत देण्यात यावी म्हणून महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-संकीर्ण २०२५./प्र.क्र.२००/कामगार-९ मंत्रालय, मुंबई-३२ दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या शासन परिपत्रकाद्वारे आदेशीत केलेले आहे. जालना जिल्ह्यातील सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू राहिल (उदा. खाजगी कंपन्या या मधील आस्थाना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्ये गृह, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इ.)

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींच्या मालकांनी, व्यवस्थापनाने वरील सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल, याची काटेकारपणे खबरदारी घ्यावी. मतदारांकडुन मतदानाकरिता योग्य ती सुट्टी प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित आस्थापनांविरुध्द कारवाई करण्यात येईल. याबाबतीत उदभवणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी सरकारी कामगार अधिकारी, जालना यांच्या कार्यालयामध्ये दक्षता कक्ष स्थापना करण्यात आलेला आहे. तरी संबंधित कामगार, कामगार संघटनांनी दुरध्वनी क्र. ०२४८२-२०३०२९६ यावर संपर्क साधावा किंवा govtlabour.officer52gmail.com या ई-मेल आयडी वर तक्रार करावी. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# जालना दर्गाह वक्फ मालमत्तेतील अनियमिततेवर त्वरित कारवाईची मागणी

### अर्जदारांचे व्यवस्थापन समितीला निवेदन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** मौजे जालना येथील वक्फ संस्था दर्गाह हजरत जानुउल्लाशाह (रह.) यांच्या मालकीच्या नगर भूमापन (उढड) क्रमांक ६८६० व ६८६१ या मिळकतींवर मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर बांधकामे, अनधिकृत होर्डिंग्ज आणि लहान व्यापाऱ्यांकडून अवैध वसुली सुरू असल्याचा गंभीर आरोप दोन अर्जदारांनी केला आहे. यासंदर्भातील निवेदन दर्गाह व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यांना सादर करण्यात आले असून अर्जदारांनी त्वरित कारवाईची मागणी केली आहे.

अर्जदार सय्यद शाकेर सय्यद महेमुद आणि तौसीफ अहमद सुलतान अहमद फारुकी यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, जुन्या लोखंडी पुलाजवळील वक्फ मालमत्तेवर काही गुंठेवाटप करणाऱ्या व्यक्तींनी ठ.उ.उ. बांधकाम उभारून बेकायदेशीर शादीखाना चालवला आहे. या ठिकाणाहून दरवर्षी अंदाजे १० ते १२ लाख रुपये उत्पन्न मिळते, मात्र वक्फ संस्थेला यापैकी एकही रुपया मिळत नाही. यामुळे दर्गाह व संबंधित मस्जिदींचे आर्थिक नुकसान होत असून, इमाम व मुअज्जिन यांना मासिक मानधन देणेही कठीण झाल्याचे अर्जदारांनी सांगितले आहे.त्याचबरोबर, गरिबशाह कब्रस्तान परिसरातही बेकायदेशीर होर्डिंग्ज लावून दरवर्षी २ ते ३ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न केले जात असल्याचे नमूद केले आहे. ही जागा पूर्णपणे वक्फ मालकीची असून अशा प्रकारची कमाई अवैध असल्याचे अर्जदारांचे म्हणणे आहे. कब्रस्तानाच्या आजूबाजूला सुमारे २० ते २२ ठेला, कपडे व पादत्राणे यासारखे लहान व्यावसायिक रोजीरोटी चालवतात, मात्र काही व्यक्तींनी या छोट्या विक्रेत्यांकडून दररोज ४००० ते ४५०० रुपये हप्ता वसूल केला जात असल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. यामुळे गरीब कुटुंबांवर आर्थिक अन्याय होत असून शहराच्या विकासात अडथळा निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद आहे.

याशिवाय, वक्फ सर्व्हे नं. २३२ मधील मोहम्मदीया मस्जिदीतून काही व्यक्ती महिन्याकाठी अंदाजे ७० ते ७५ हजार रुपये घेत असल्याचा आणि त्याचा कोणताही लेखाजोखा नसल्याचा आरोपही अर्जदारांनी केला आहे. यामुळे वक्फ संस्थेच्या आर्थिक हानीत वाढ झाली असून व्यवस्थापनाच्या दुर्लक्षामुळे संस्थेच्या मालमत्तेचा दुरुपयोग होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

अर्जदारांनी या सर्व अनियमितता त्वरित थांबवून वक्फ मालमत्ता मुक्त करण्याची मागणी केली असून, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. निवेदनावर सय्यद शाकेर सय्यद महेमुद, तौसीफ अहमद सुलतान अहमद फारुकी आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. अर्जदारांनी या प्रकरणाची गंभीरतेने दखल घेऊन त्वरित कारवाई करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून वक्फ संस्थेच्या मालमत्तेचे संरक्षण होऊ शकेल आणि धार्मिक स्थळांच्या आर्थिक नुकसानाला आळा बसेल.



# भारतीय कामगार सेना- महिको कंपनीमध्ये वेतन वाढीचा ११ वा ऐतिहासिक करार

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** भारतीय कामगार सेना आणि महिको कंपनी यांच्यामध्ये आज ११ वा ऐतिहासिक वेतनवाढीचा करार करण्यात आला, जो कामगारांसाठी अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. या करारात कंपनीत काम करणाऱ्या मुनिम, ड्रायव्हर, सालदार, महिनदार यांसारख्या कर्मचाऱ्यांना विविध सुविधांसह मासिक ४,५०४ रुपयांची वेतनवाढ दिली जाणार आहे. या वाढीमुळे कामगारांचे आर्थिक जीवनमान सुधारण्यास मोठा हातभार लागणार आहे. करारानंतर कामगारांनी आनंद व्यक्त करत फटाके फोडणे, गुलाल उधळणे आणि एकमेकांना पेढे देणे यासह उत्सव साजरा केला. या प्रसंगी कामगारांच्या सुखद भविष्याची अपेक्षा आणि एकात्मतेचा अनुभव सर्वत्र दिसून आला.

करारानुसार कामगारांना वर्षातून दोन युनिफॉर्म सिलाईसह नवीन शुज, रेणकोट, स्वेटर तसेच बारा महिन्यात ३६ सुट्या, घर बांधणीसाठी कर्ज, दिवाळीसाठी १५ हजार रुपयांचा ॲडव्हान्स, २० टक्के बोनस, ग्रज्युटी, अत्यावश्यक कामासाठी एमर्जन्सी लोन यासह इतर अनेक सवलती मिळणार आहेत.

यामुळे कामगारांना केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिक सुरक्षा आणि जीवनमान सुधारण्यासाठी आवश्यक सुविधा देखील मिळतील.कराराच्या बैठकीस महिको कंपनीच्या वतीने उपाध्यक्ष अजय वैद्य, सलिल भिडे, महेंद्र चव्हाण, दिपक दरक, विनय नखाते आणि राजेंद्र बनकर उपस्थित होते. भारतीय कामगार सेनेच्या वतीने विभागीय संयुक्त चिटणीस प्रभाकर मते, जिल्हाध्यक्ष जनार्धन रेगुडे, युनिटचे पदाधिकारी मदन म्हस्के, दादाराव कावले, विठ्ठल चंद आणि महेबुबखाँ पठाण यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.हा ऐतिहासिक करार केवळ वेतनवाढपुरता मर्यादित न राहता कामगारांच्या हितासाठी एक व्यापक पायाभूत सुविधा म्हणून ओळखला जात आहे. यामुळे कंपनीतील कामगारांचे मनोबल वाढेल आणि त्यांच्या कार्यक्षमतेतही वाढ होईल, असा विश्वास संबंधितांनी व्यक्त केला आहे. कामगारांसाठी हा करार भविष्यातील आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक सुरक्षिततेचा महत्वपूर्ण टप्पा ठरेल.

# महामार्गावरील दारू दुकानांवर गदा येणार का?

### नशा मुक्त महाराष्ट्र आणि राजस्थान उच्च न्यायालयाचा दणका

महाराष्ट्रातील 'नशा मुक्त महाराष्ट्र' मोहिमेच्या पार्श्वभूमीवर राजस्थान उच्च न्यायालयाचा दारू दुकानदारांविरुद्ध दिलेला निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवी मुंबईमध्ये 'नशा मुक्त नवी मुंबई' अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी स्पष्ट केले की, आपण जसे प्रगती करत आहोत, तसे आपल्या तरुणांना ड्रग्जच्या माध्यमातून आतून कमकुवत केले जात आहे. याचा अर्थ असा की, महाराष्ट्र सरकार केवळ औपचारिक उपाययोजना करत नाही, तर तरुणाईला व्यसनमुक्त ठेवण्यासाठी ठोस प्रयत्न करत आहे. मात्र, रस्ते सुरक्षा आणि दारूच्या सहज उपलब्धतेचा प्रश्न अजूनही गंभीर आहे.

राजस्थान उच्च न्यायालयाने कन्हैया लाल सोनी विरुद्ध राजस्थान सरकार या प्रकरणात महामार्गावर दारू दुकाने ठेवण्याविषयी निर्णायक भूमिका घेतली. न्यायालयाने लक्षात आणून दिले की, सर्वोच्च न्यायालयाने स्टेट ऑफ तामिळनाडू विरुद्ध के. बालू या खटल्यात ठरविलेल्या नियमांचे पालन अनिवार्य आहे, ज्यात स्पष्टपणे म्हटले आहे की, राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांपासून ५०० मीटरच्या आत दारूची दुकाने नसावीत आणि ती थेट महामार्गावरून दिसू नयेत. मात्र, राजस्थान सरकारने महसुलाच्या फायद्याचे कारण दाखवत तब्बल ११०२ दारूची दुकाने महामार्गालगत सुरू ठेवली होती, ज्यामुळे राज्याला २२२१.७८ कोटी रुपयांचा महसूल मिळत होता. न्यायालयाने या धोरणावर कडक प्रतिक्रिया व्यक्त केली आणि म्हटले की, महसुला हा नागरिकांच्या जीवापेक्षा महत्त्वाचा ठरू शकत नाही, आणि राज्याचे कर्तव्य नागरिकांचे जीवन रक्षण करणे आहे.

न्यायालयाने आदेश दिला की, महामार्गांवर येणारी सर्व ११०२ दारूची दुकाने दोन महिन्यांच्या आत हटवली किंवा स्थलांतरित केली जावीत. ही दुकाने नगरपालिका क्षेत्रात असली तरीही हा नियम लागू राहील. शिवाय, दारूच्या जाहिराती आणि फलक महामार्गावरून दिसणार नाहीत याची दक्षता घ्यावी. हा आदेश फक्त राजस्थानापुरता मर्यादित नाही; तो संपूर्ण देशासाठी आदर्श मानला जातो.

महाराष्ट्रासाठी हा निर्णय एक महत्त्वपूर्ण धडा ठरतो. महाराष्ट्रातही रस्त्यावरील दारूच्या उपलब्धतेमुळे अपघात आणि मृत्यूंची संख्या चिंताजनक आहे. सरकारी आकडेवारीनुसार, अनेक अपघात दारूच्या मदतीने चालवलेल्या वाहनांमुळे होत आहेत. 'नशा मुक्त महाराष्ट्र' मोहिमेचा उद्देश फक्त ड्रग्स आणि दारूच्या सेवनावर मर्यादा घालणे नाही, तर रस्ते सुरक्षा आणि नागरिकांचे जीवन सुरक्षित ठेवणे देखील आहे.

महेश एस. धनावत यांच्या मते, राजस्थानचा निर्णय भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत जीवनाच्या अधिकाराला सर्वोच्च प्राधान्य देतो. सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेले नियम जनतेच्या सुरक्षिततेसाठी आहेत, महसुलासाठी त्यांचा गैरवापर करणे म्हणजे नागरिकांच्या जीवाशी धोक्याचा खेळ. त्यामुळे महाराष्ट्रात देखील महामार्गालगत दारू दुकाने हटवणे ही अपरिहार्य आवश्यकता आहे.

राजस्थान उच्च न्यायालयाचा हा निर्णय महाराष्ट्रासाठी एक आव्हान ठरतो. सरकारला आता ठरवावे लागेल की महसुलाला प्राधान्य देणार की नागरिकांच्या जीवाला. जर महाराष्ट्र सरकारनेही राजस्थानच्या पद्धतीने कठोर निर्बंध लादले, तर 'नशा मुक्त महाराष्ट्र' मोहिमेची खरी व्याप्ती दिसून येईल आणि रस्ते सुरक्षा व तरुणांच्या आरोग्याचा प्रभावी रक्षण होईल. महाराष्ट्रातील नागरिकांसाठी हा निर्णय एक धडा ठरतो - आर्थिक लाभाच्या नावाखाली सुरक्षिततेचा फासला जाऊ नये, आणि राज्याचे दायित्व जनतेच्या जीवनाचे रक्षण करणे हे सर्वोच्च असावे.

# मानवमुक्तीचा दीर्घ संघर्षः आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिनाचे समाजशास्त्रीय महत्त्व

दि. २ डिसेंबर हा दिवस मानवसभ्यतेच्या इतिहासातील सर्वात काळ्या अध्यायाला आणि त्यावरील संघर्षाला उजाळा देणारा दिवस आहे. आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिन हा केवळ एक स्मरणदिन नाही, तर आजही जगभर वेगवेगळ्या स्वरूपात जिवंत असलेल्या आधुनिक गुलामगिरीविरोधातील लढ्याचे प्रतीक आहे. इतिहासाच्या पानावर गुलामगिरी जणू काही भूतकाळातील घटना आहे असे आपल्याला वाटत असले तरी वास्तविकता अतिशय कठोर आहे. आजही जगात लाखो लोक अद्याप गुलामगिरीच्या अंधाऱ्या चक्रात अडकलेले आहेत. मानव सभ्यतेने विज्ञान, शिक्षण, तंत्रज्ञान व लोकशाही सरकारव्यवस्था यांसारख्या क्षेत्रांत अमाप प्रगती केली आहे, परंतु मानवाधिकार, मानवी प्रतिष्ठा आणि समानतेच्या दृष्टिकोनातून पाहता गुलामगिरीचे अनेक स्वरूप आजही समाजाच्या पृष्ठभागाखाली धुमसत आहेत.

इतिहासात गुलामगिरी ही केवळ आर्थिक मालकीची व्यवस्था नव्हती, तर सत्ता, वर्ण, धर्म, जात, भौगोलिक वंश आणि सामाजिक वर्चस्व यांच्या आधारावर उभी केलेली एक अमानवी संघटना होती. प्राचीन इजिप्त, रोम, ग्रीस, बाबिलोनिया किंवा भारतातील सामंतशाही काळातील शूद्र व दलितांवरील वागणूक असो यामध्ये सर्वत्र गुलामगिरीचे स्वरूप दिसून आले आहे. परंतु मध्ययुगीन वसाहतवादाने या व्यवस्थेला अधिक क्रूर रूप दिले. विशेषतः आफ्रिकन लोकांना पकडून अमेरिकन देशांत विकण्याची मानवी तस्करी ही इतिहासातील सर्वात क्रूर आणि अमानवी आर्थिक व्यवस्था होती. लाखो लोकांना जबरदस्तीने जहाजांत भरून गुलाम म्हणून विकले गेले, त्यांच्या कुटुंबांना विभक्त केले गेले, त्यांची ओळख, भाषा, संस्कृती, तसेच मानवी अस्तित्वच हिरावून घेतले गेले. मानवाला पशूपेक्षाही कनिष्ठ गणले गेले. आज आफ्रिकन-अमेरिकन समाजात दिसणारे जातीय विभाजन आणि सामाजिक विषमता हा त्या वसाहतवादी गुलामगिरीचा दाहक परिणाम आहे.

गुलामगिरीविरोधी चळवळीने जगभरात मानवाधिकारांची आणि सामाजिक समानतेची नवी लाट निर्माण केली. १९व्या शतकात ब्रिटन, फ्रान्स आणि अमेरिकेसह अनेक राष्ट्रांनी गुलामगिरीविरोधात कायदे केले आणि अखेर संयुक्त राष्ट्रांनी २ डिसेंबर १९४९ रोजी 'ॠैलशव डरलींी उेपींशपींळेप' ला मान्यता देऊन गुलामगिरी निर्मूलन करून जागतिक लढा औपचारिक केला. १९८५ पासून ही तारीख आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिन म्हणून साजरी केली जात आहे. हा दिवस मानवजातीच्या इतिहासातील एक जागृतीचे प्रतीक ठरतो, जो सांगतो की मानवी स्वातंत्र्य हे कोणत्याही राष्ट्राचे नव्हे तर संपूर्ण मानवजातीचे मूलभूत अस्तित्व आहे.

परंतु आजही खऱ्या अर्थाने गुलामगिरी नष्ट झालेली नाही. संयुक्त राष्ट्रांच्या ताज्या अहवालानुसार जगात अद्याप ५० ते ५५ दशलक्ष लोक आधुनिक गुलामगिरीचे बळी आहेत. ही गुलामगिरी रूप बदलून समाजात खोलवर रुजलेली आहे. आज गुलामगिरीचे आधुनिक स्वरूप अधिक गुंतागुंतीचे, अदृश्य आणि तंत्रज्ञानाच्या आधारे सक्रिय आहे. मानव तस्करी, बालमजुरी, सक्तीची मजदुरी (ईपवशव डरलींी), जबरदस्तीचे विवाह, लैंगिक गुलामगिरी, अवयव व्यापार, सायबर सेक्स ट्रॅफिकिंग, ऑनलाइन पेड चाइल्ड अब्यूज, घरगुती नोकरांचे शोषण, स्थलांतरित कामगारांचे आर्थिक गुलामीकरण या सर्व आधुनिक गुलामगिरीच्या व्याख्या आहेत.

विशेषतः महिला आणि मुली या गुलामगिरीचे सर्वात मोठे बळी आहेत. बालविवाह, हुंडा, आर्थिक अवलंबित्व, शिक्षणापासून वंचितता आणि लैंगिक शोषणामुळे त्यांना गुलामगिरीच्या दलदलीतून बाहेर येणे कठीण होते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर गुलामगिरी ही केवळ व्यक्तीगत हिंसाचाराची घटना नाही; तर ती संरचनात्मक हिंसा आहे. समाजातील वर्ग, वर्ण, जात, लिंग आणि सत्ता यांच्या विषमतेतून गुलामगिरी जन्म घेते. समाज जर असमान, अन्यायकारक आणि सत्ताकेंद्रित असेल तर गुलामगिरी आपोआप वाढीस लागते.

भारताच्या संदर्भात पाहिले तर गुलामगिरीचे स्वरूप ऐतिहासिकदृष्ट्या जातिव्यवस्थेच्या आधारावर रचले गेले. दलित, भटके विमुक्त समाज, आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या वंचित समुदायांवर शतकानुशतके स्वयंपूर्णतेचा अधिकार हिरावून घेतला गेला. आजही भारतात बंधकाम मजूर, ईंटभट्ट्या, कारखाने, शेती, मत्स्यउद्योग आणि बांधकाम क्षेत्रात लाखो लोक आधुनिक गुलामगिरीचे बळी आहेत. भवानी मंडईतील कर्जावर काम करणारे शेतमजूर, घरकामगार, देवदासी प्रथा, तस्करीला बळी पडलेल्या महिला आणि मुली, तसेच बालमजुरीमध्ये अडकलेली मुलं ही उदाहरण या समस्येची गंभीरता दर्शवतात.

जागतिकीकरण आणि भांडवलशाहीने श्रमबाजाराला अधिक असुरक्षित केले आहे. मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या स्वस्त मजुरीच्या शोधात गरीब देशांतील लोकांना शोषतात. त्यामुळo Consumption-based slavery economy हा शब्द आज वापरला जातो, ज्याचा अर्थ असा की ग्राहकांनी वापरलेल्या वस्तूंच्या निर्मितीत गुलामांचं श्रम सामील असतं. फॅशन उद्योगातील ॠींीं ॠीह-ळेप, खनिज उत्खनन उद्योग, साखर, चहा, कोको, हिरे आणि इलेक्ट्रॉनिक उद्योगाच्या उत्पादन प्रक्रियेत मानवाधिकारांचे उल्लंघन सर्वाधिक आढळते.

या परिस्थितीत माध्यमं, शिक्षण, कायदे आणि मानवी हक्क चळवळींची भूमिका महत्त्वाची ठरते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO), -mnesty International, UN Human Rights Office of the High Commissioner, -nti-Slavery International, Free the Slaves सारख्या अनेक संस्थांनी आधुनिक गुलामगिरीविरोधात लढा पुकारला आहे. अनेक देशांनी कठोर कायदे केले परंतु कायद्यापेक्षा सामाजिक जागृतीची कमतरता ही या समस्येचे महत्त्वाचे कारण आहे.

गुलामगिरी या शब्दात केवळ बळजबरी, हिंसा, शोषण एवढाच अर्थ नाही, तर त्यात मानवी प्रतिष्ठेचा पूर्ण नाश दडलेला आहे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813